# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६३/२००७/३२**
**तक्रार दाखल दिनांक ;- १८/१०/२००७**
**निकाल दिनांक ;- २७/११/२००७**

**श्रीमती आशा जालम जाधव,**
१०, अथर्व आर्केड, मारुती नगर,
मयुरपार्क रोड, औरंगाबाद. अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ, औरंगाबाद.**

विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६ च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक १८/१०/२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १८/१०/२००७ रोजी

औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) किंवा नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०६/११/२००७ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदारास वीज वितरण कंपनीकडून अथर्व आर्केड येथील प-लॅट क्रमांक १० येथे घरगुती वापरासाठी वीज पुरवठा जून २००२ मध्ये करण्यात आला. त्याला देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००११५७६४७५ असा असून मीटर क्रमांक ९०१०८४१०८४ हा आहे. अर्जदाराने ऑगस्ट २००६ पर्यंत मीटरवरील नोंदीप्रमाणे नियमीतपणे बिल भरलेले आहे. ऑगस्ट - सप्टेंबर २००६ या काळात त्याला १०३४ युनिट वापराचे वीज बिल आकारण्यात आले. या चुकिच्या बिलाबाबत अर्जदाराने केलेल्या तक्रारीची दखल न घेतली गेल्यामुळे त्यांनी वीज बिलाचा भरणा केला नाही. दिनांक २०/०१/२००७ रोजी अर्जदार व त्याचे शेजारी यांचे वीज मीटर चोरीला गेले ज्याची तक्रार २१/०१/२००७ रोजी त्यांनी संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये केली आहे. वीज कंपनीकडून त्यांना नवीन मीटरसाठी ७००/- रकमेचे कोटेशन देण्यात आले जे त्यांनी भरले आहे.ही रक्कम भरल्यानंतर त्यांना नवीन मीटर न देता, वीज वापर नसतांना वीज बिल आकारण्यात आले. म्हणून त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे व वीज बिल दुरुस्ती करुन नवीन मीटर लावण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३) दिनांक ०६/११/२००७ रोजी सुनावणीच्या वेळी ग्राहक प्रतीनिधी म्हणून श्री पुंडलीक चव्हाण उपस्थीत होते नोडल अधिकारी श्री एस. जी.पवार यांनी या प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे सुनवणीची तारीख वाढवण्यासंबंधी अर्ज केला. नोडल अधिका-याची मागणी मान्य करुन मंचाने पुढील सुनावणीची तारीख १३/११/२००७ अशी निश्चीत केली.

४) दिनांक १३/११/२००७ रोजी मंचा समोर झालेल्या सूनावणीच्या वेळी महावितरणचे नोडल अधिकारी श्री पवार व ग्राहक प्रतिनिधी श्री पुंडलीक चव्हाण उपस्थीत होते. नोडल अधिका-यांनी आपला जबाब सुनावणीच्या वेळी दाखल केला त्याची एक प्रत ग्राहक प्रतीनिधी यांना देण्यात आली.त्यांनी दाखल केलेल्या जबाबा नुसार ग्राहाकास देण्यात आलेले १०३४ युनिटचे बिल हे ॲक्युम्यूलेटेड (एकत्रीत जमा) असुन मीटर रिडरच्या चूकीमुळे देण्यात आले असल्याचे म्हटले आहे. अर्जदाराचे बिल ज्यास्त रकमेचे असल्यामुळे त्यांने मीटर चोरी गेले असल्याचा देखावा तयार केला असल्याचे म्हटले आहे. अर्जदाराने चोरी गेलेल्या मिटरची किंमत अदा केली नाही. असे त्यांनी जबाबात पुढे म्हटले आहे. अर्जदाराने चोरीस गेलेल्या मीटरची किंमत व थकीत बिल भरल्यानंतर त्याला वीज पुरवठा पुनर्जोडणी करुन देण्यात येईल असे त्यांनी मंचात दाखल केलेल्या जबाबात म्हटले आहे.

५) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सूनावणी वरुन असे आढळून येते की,महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास २२ जून२००२मध्ये घरगूती वापरासाठी वीज पुरवठा देण्यात आला.त्याला देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००११५७६४७५ असा असून जुन्या

मिटर चा क्रमांक ९०१०८४१०८४ असा आहे.नविन वीज जोडणी मिळाल्यानंतर, म्हणजेच जून २००२ ते ऑगस्ट २००६ पर्यंतच्या काळातील अर्जदारास देण्यात आलेली वीज देयके त्याने भरलेली असल्याचे आढळून येते. नोडल अधिका-या तर्फे दाखल करण्यात आलेल्या सी.पी.एल. चे व अर्जदाराने दाखल केलेल्या मागील १२ महिन्याच्या बिलाचे अवलोकन केल्यावर अर्जदाराचा वीज वापर हा सरासरी दरमहा ४० ते ५० युनिट असा आढळतो. ऑगस्ट २००६ ते ऑक्टोबर २००७ या कालावधीसाठी वीज वितरण कंपनी तर्फे त्याला १०३४ युनिट वापराचे बिल देण्यात आले व या वाढीव बिलाबाबत अर्जदाराने दिनांक १२/१०/२००६ रोजी वीज वितरण कंपनीकडे तक्रार दाखल केली आहे. दिनांक २०/०१/२००७ रोजी अर्जदाराचे मीटर चोरीला गेल्यामुळे त्याचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. या बाबत त्याने दिनांक २१/०१/२००७ रोजी पोलीस स्टेशनला लिखीत स्वरुपात सुचना केलेली आढळते.वीज वितरण कंपनी तर्फे मीटर कॉस्ट बाबत अर्जदारास देण्यात आलेले ७००/- रुपयाचे कोटेशन त्याने १६/०३/२००७ रोजी भरल्याचे आढळते. मीटर चोरीला गेल्यानंतर व वीज पूरवठा नसतांना सुध्दा त्यांना वीज वितरण कंपनी तर्फे जानेवारी २००७ नंतरच्या कालावधीकरीता २०९ युनिट प्रतीमहा वापराचे बिल देण्यात येत होत जे चुकीचे असल्याचे दिसते. अर्जदाराने मीटर चोरीला गेल्यानतंर त्याच्या किंमतीचा भरणा केल्यानंतर सुध्दा त्याला नविन मीटर न देता त्याचा वीज पुरवठा खंडीत ठेवण्यात आला व त्याला वीज वापरापासून वंचित ठेवण्यात आले. या बाबतीत ग्राहकाने वीज बिल भरणे टाळण्यासाठी वीज मीटर चोरीला गेल्याचा बनाव केला व मिटर कॉस्ट भरली नसल्याचे नोडल अधिका-याचे म्हणणे अत्यंत बेजबाबदारीचे व चुकिचे आहे.

वरील सर्व बाबींचे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने दाखल केलेली तक्रार योग्य आसल्याचे मंचाचे मत आहे व अर्जदार हा त्यास वीज वितरण कंपनीकडून देण्यात आलेल्या मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे

मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदाराचा वीज पुरवठा कोणतेही शुल्क न घेता २४ तासाच्या आत जोडणी करुन देण्यात यावा.
२) ऑगस्ट २००६ नतंर अर्जदारास देण्यात आलेली सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.
३) ऑगस्ट २००६ ते जानेवारी २००७ या कालावधीकरीता अर्जदारास मागिल १२ महिन्याच्या (ऑगस्ट २००५ ते ऑगष्ट २००६ ) वीज वापराच्या सरासरीवर आधारीत सुधारीत बिल देण्यात यावे.
४) २१ जानेवारी २००७ पासून वीज मिटर नसल्यामुळे वीज वापर शुन्य आहे म्हणून २१ जानेवारी २००७ पासून वीज वापर शुन्य धरुन पुढील सुधारीत बिले द्यावीत.
५) अर्जदाराने मीटरची किंमत भरल्यानतंर सुध्दा त्याला वीज वापरा पासून वंचित ठेवून दिलेल्या मानसिक त्रासापोटी वीज वितरण कंपनीने अर्जदारास रुपये १५००/- नुकसान भरपाई ३० दिवसाच्या आत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/६३/२००७/३२** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्रीमती आशा जालम जाधव,**
१०, अथर्व आर्केड, मारुती नगर,
मयुरपार्क रोड, औरंगाबाद.

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६३/२००७/३२
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone-2336172**

**No,CGRF/AZ/AUR/U//63/2007/32/** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**M.S.E.D.C.L. O&M Urban Circle,**
**Aurangabad.**

**Sub**: Postponement of Grievance Case No.63/2007/32
**(Consumer No. 490011576475)**
**Ref:- Letter No.CGRF/AZ/AUR/U/63/2007/32/232**
**dt. 18.10.2007**

Dear Sir,

With reference to the bove subject, the hearing of the grievance in respect of Smt. Asha Jalam Jadhav, Plot No. 10, Atharv Arcked Marutinagar, Mayurpark,, Aurangabad (Consumer No.490011576475) is **postponed and the next date of hearing is 13.11.2007 at 12.00 Hours**

You are therefore requested to be present along with the concerned in charge at the time of hearing .

**Member Secretary**
**C.G.R.F. Aurangabad**

**Copy to:-**
Smt. Asha Jalam Jadhav,
Plot No.10, Atharv Arcked Marutinagar,
Mayurpark,, Aurangabad
**For information and take a note of hearing date and time.**